426

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३०/०८/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, राजपत्र विधि व न्याय विभाग असाधारण भाग चार दि.२७/०९/२०२४ ची अधिसूचना

**विषय :-** महाराष्ट्र अधिनियम क्र.३१ स्पर्धा परीक्षांमधील अनुचित मार्गास प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबधित किंवा तदानुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

******

महाराष्ट्र शासन , विधि व न्याय विभाग राजपत्र, असाधारण भाग चार महाराष्ट्र अधिनियम क्र.३१ स्पर्धा परीक्षांमधील अनुचित मार्गास प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबधित किंवा तदानुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियमाची प्रत सोबत जोडली आहे.

२. तरी, सदर शासन अधिसूचनेमध्ये निर्देशानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी ही विनंती

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके / आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह) पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.1 ते 19
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १३(३)] बुधवार, जुलै ३१, २०२४/श्रावण ९, शके १९४६ [पृष्ठे ९, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—** स्पर्धा परीक्षांमधील अनुचित मार्गांस प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. | **पृष्ठे** १-९ |

दिनांक २९ जुलै २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.**

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**स्पर्धा परीक्षांमधील अनुचित मार्गांस प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** स्पर्धा परीक्षांमधील अनुचित मार्गांस प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी नवीन कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**प्रकरण-एक**

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**प्रकरण दोन**

**व्याख्या.**

व्याख्या. **२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " उमेदवार " याचा अर्थ, स्पर्धा परीक्षेस बसण्यासाठी स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाकडून जिला परवानगी देण्यात आलेली आहे अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, स्पर्धा परीक्षेत तिच्या वतीने लेखनिक म्हणून काम करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचा समावेश होतो ;

(ख) " संदेशवहन साधन " यास, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (जक) मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच अर्थ असेल ; २००० चा २१.

(ग) " स्पर्धा परीक्षा " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाने घेतलेली, किंवा राज्य शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य प्राधिकरणाने घेतलेली स्पर्धा परीक्षा, असा आहे ;

(घ) " स्पर्धा परीक्षा प्राधिकरण " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी राज्य शासनाने, वेळोवेळी, नेमलेली किंवा घटित केलेली निवड समिती अथवा अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही परीक्षा प्राधिकरण, असा आहे ;

(ङ) " स्पर्धा परीक्षा केंद्र " याचा अर्थ, स्पर्धा परीक्षा घेण्याकरिता वापर करण्यासाठी सेवा पुरवठादाराने ज्या निवडलेल्या आहेत किंवा स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाने अन्यथा ज्या निवडलेल्या आहेत आणि ज्यांमध्ये, इतर गोष्टींबरोबरच, कोणतीही शाळा, संगणक केंद्र, संस्था, कोणतीही इमारत किंवा तिचा काही भाग यांचा समावेश होईल अशा जागा, असा आहे आणि त्यांमध्ये, जिचा वापर, सुरक्षेसाठी व स्पर्धा परीक्षा घेण्याच्या इतर संबंधित कारणांसाठी केला जाऊ शकेल, अशा संपूर्ण परिसीमेचा व त्याच्याशी संलग्न जमिनीचा समावेश होईल ;

(च) " संगणक नेटवर्क ", " संगणक संसाधन " व " संगणक प्रणाली " यांना, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ञ), (ट) व (ठ) यांमध्ये अनुक्रमे, जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच असतील ; २००० चा महा. २१.

(छ) " स्पर्धा परीक्षा घेणे " यामध्ये, स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी अवलंबिण्यात येणा-या विहित करण्यात येईल अशा सर्व कार्यपद्धतींचा, प्रक्रियांचा व क्रियांचा समावेश असेल ;

(ज) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(झ) " संस्था " याचा अर्थ, जे स्पर्धा परीक्षा प्राधिकरण आणि अशा प्राधिकरणाने नेमलेला सेवा पुरवठादार याव्यतिरिक्त आहे असे, कोणतेही अभिकरण, संघटना, निकाय, व्यक्तींचा संघ, व्यवसाय संस्था, कंपनी, भागीदारी संस्था किंवा एकल मालकी असलेली भागीदारी संस्था, —मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो—, असा आहे.

२०१३ चा १८. **स्पष्टीकरण.-** या खंडाच्या प्रयोजनांसाठी, असे स्पष्ट करण्यात येते की, " कंपनी " यामध्ये, कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम २ च्या खंड (२०) मध्ये व्याख्या केलेल्या
२००९ चा ६. कंपनीचा ; किंवा मर्यादित दायित्व भागीदारी संस्था अधिनियम, २००८ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ढ) मध्ये व्याख्या केलेल्या मर्यादित दायित्व भागीदारी संस्थेचा समावेश होतो ;

(ञ) " अधिसूचना " याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे आणि "अधिसूचित करणे " या शब्दप्रयोगाचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल ;

(ट) " संघटित गुन्हा " याचा अर्थ, स्पर्धा परीक्षेच्या बाबतीत गैरलाभ मिळवण्यासाठी सामायिक हितसंबंध जोपासण्याकरिता किंवा त्यास प्रोत्साहन देण्यासाठी संगनमताने व कट करून, अनुचित मार्गांमध्ये गुंतलेल्या एखाद्या व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या गटाने केलेली बेकायदेशीर कृत्ये, असा आहे ;

(ठ) " सेवा पुरवठादाराशी सहयोगी असलेली व्यक्ती " याचा अर्थ, जी व्यक्ती, अशा सेवा पुरवठादारासाठी किंवा त्याच्या वतीने सेवा करते, —मग अशी व्यक्ती, अशा सेवा पुरवठादाराची कर्मचारी असो किंवा अभिकर्ता असो किंवा, यथास्थिति, दुय्यम संस्था असो,- असा आहे ;

(ड) " प्राश्निक " याचा अर्थ, प्रश्न किंवा प्रश्न पेढी किंवा प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती किंवा संस्था, असा आहे ;

(ढ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ण) " सेवा पुरवठादार " याचा अर्थ, स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाने ज्याची नेमणूक केलेली आहे, असे कोणतेही अभिकरण, संघटना, निकाय, व्यक्तींचा संघ, व्यवसाय संस्था, कंपनी, भागीदारी संस्था किंवा एकल मालकी असलेली भागिदारी संस्था, तसेच कोणतीही संगणक संसाधने किंवा कोणतेही साहित्य यांचा पुरवठा करणारे त्याचे सहयोगी, उप-कंत्राटदार किंवा पुरवठादार, —मग त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,- - असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले, परंतु, व्याख्या न केलेले आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या कायद्यांमध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

## प्रकरण तीन

## अनुचित मार्ग व अपराध.

अनुचित मार्ग. **३.** स्पर्धा परीक्षा घेण्याशी संबंधित असलेल्या अनुचित मार्गांमध्ये, कोणत्याही उमेदवाराने किंवा कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या गटाने किंवा संस्थांनी केलेले किंवा करण्याची व्यवस्था केलेले कोणतेही कृत्य किंवा अकृत्य यांचा समावेश असेल, आणि त्यामध्ये, आर्थिक किंवा गैरलाभ मिळविण्यासाठी केलेल्या, परंतु तेवढ्यापुरतेच निर्बंधित नसलेल्या पुढीलपैकी कोणत्याही कृत्यांचा समावेश असेल :-

(एक) स्पर्धा परीक्षेत, कोणत्याही उमेदवाराचा, स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या पाठिंब्याने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग अथवा परीक्षेत कोणत्याही लिखित, अ-लिखित, उद्धृत, नक्कल केलेल्या, मुद्रित केलेल्या साहित्याचा, इलेक्ट्रॉनिक किंवा माहिती तंत्रज्ञान (आयटी) उपकरणांमधून मिळविलेल्या साहित्याचा बेकायदेशीर वापर करणे अथवा परीक्षेमध्ये कोणतीही अनुचित व इतर अनधिकृत मदत घेणे किंवा कोणतेही अनधिकृत इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिक साधन किंवा उपकरण, इत्यादींचा वापर करणे ;

(दोन) परीक्षेमध्ये तोतयेगिरी करणे ;

(तीन) प्रश्नपत्रिका किंवा उत्तर तालिका (ॲन्सर की) किंवा त्याचा कोणताही भाग फोडणे ;

(चार) प्रश्नपत्रिका किंवा उत्तर तालिका (ॲन्सर की) फोडण्यासाठी इतरांशी संगनमताने सहभाग घेणे ;

(पाच) कोणत्याही प्राधिकाराशिवाय, प्रश्नपत्रिका किंवा एखादे ऑप्टिकल मार्क रेकग्निशन रिस्पॉन्स (अनुक्रिया) पत्र किंवा इतर कोणत्याही पद्धतीची उत्तरपत्रिका अनधिकृतपणे मिळविणे किंवा ताब्यात घेणे ;

(सहा) स्पर्धा परीक्षेच्या कालावधीत कोणत्याही अनधिकृत व्यक्तीद्वारे, एक किंवा अधिक प्रश्नांची उत्तरे पुरविणे ;

(सात) स्पर्धा परीक्षेमध्ये, कोणत्याही अनधिकृत रीतीने उमेदवारास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सहाय्य करणे ;

(आठ) ऑप्टिकल मार्क रेकग्निशन रिस्पॉन्स (अनुक्रिया) पत्रांसह उत्तरपत्रिकांमध्ये अनधिकृतपणे फिरवाफिरव करणे ;

(नऊ) कोणत्याही प्राधिकाराशिवाय वास्तविक दोष दुरूस्त करण्याखेरीज मूल्यनिर्धारणामध्ये फेरफार करणे ;

(दहा) राज्य शासनाने किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने, स्वतः किंवा तिच्या अभिकरणामार्फत स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी निर्धारित केलेली मानके किंवा प्रमाणके यांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करणे ;

(अकरा) एखाद्या स्पर्धा परीक्षेमध्ये उमेदवारांची चाळणी यादी (शॉर्ट लिस्ट) तयार करण्यासाठी अथवा उमेदवारांचे गुण किंवा गुणवत्ताक्रम अंतिम करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही दस्तऐवजामध्ये अनधिकृतपणे फिरवाफिरव करणे ;

(बारा) स्पर्धा परीक्षा घेताना अनुचित मार्गांचा अवलंब करणे सुकर होण्यासाठी सुरक्षा उपाययोजनांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करणे ;

(तेरा) संगणक जाळ्यामध्ये (नेटवर्कमध्ये) किंवा संगणक संसाधनांमध्ये अथवा संगणक प्रणालीमध्ये अनधिकृतपणे फिरवाफिरव करणे ;

(चौदा) परीक्षांमध्ये अनुचित मार्गांचा अवलंब करणे सुकर व्हावे यासाठी उमेदवारांच्या बैठक व्यवस्थेमध्ये, परीक्षेचा दिनांक किंवा सत्र वाटप यामध्ये हातचलाखी करणे ;

(पंधरा) परीक्षा प्राधिकरणाशी किंवा सेवा पुरवठादाराशी किंवा शासनाच्या कोणत्याही प्राधिकृत अभिकरणाशी सहयोगी असलेल्या व्यक्तींचे जीवन व स्वातंत्र्य धोक्यात आणणे किंवा स्पर्धा परीक्षा घेण्यामध्ये अडथळा आणणे ;

(सोळा) फसवणूक करण्यासाठी किंवा आर्थिक लाभ मिळविण्यासाठी बनावट संकेतस्थळ तयार करणे ; आणि

(सतरा) फसवणूक करण्यासाठी किंवा आर्थिक लाभ मिळविण्यासाठी बनावट परीक्षा घेणे, बनावट प्रवेश पत्रे निर्गमित करणे किंवा नियुक्तीपत्रे देणे.

अनुचित मार्ग अवलंबिण्याठी कट करणे.

**४.** कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट किंवा संस्था, असे कोणतेही अनुचित मार्ग अवलंबिणे सुकर होण्यासाठी संगनमत करणार नाही किंवा कट करणार नाही.

स्पर्धा परीक्षा घेण्यात अडथळा आणणे.

**५.** (१) ज्या व्यक्तीस, स्पर्धा परीक्षेशी किंवा स्पर्धा परीक्षा घेण्याशी संबंधित असलेले काम सोपविण्यात आलेले नाही किंवा संबंधित कामी तिला नेमलेले नाही अथवा जी उमेदवार नाही अशी कोणतीही व्यक्ती, स्पर्धा परीक्षा घेण्यात अडथळा आणण्याच्या इराद्याने, परीक्षा केंद्राच्या जागेत प्रवेश करणार नाही.

(२) स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी,—

(क) आर्थिक किंवा गैरलाभ मिळविण्यासाठी अनधिकृत रीतीने, अशी प्रश्नपत्रिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही ;

(ख) जेव्हा कोणतीही गोपनीय माहिती अशा प्रश्नपत्रिकेशी संबंधित असेल किंवा अशा प्रश्नपत्रिकेच्या संदर्भातील असेल तेव्हा, आर्थिक किंवा गैरलाभ मिळवण्यासाठी, कोणत्याही व्यक्तीस, अशी कोणतीही गोपनीय माहिती देणार नाही किंवा अशी गोपनीय माहिती देण्याचे अभिवचन देणार नाही.

(३) जिच्याकडे स्पर्धा परीक्षेशी संबंधित असणारे कोणतेही काम सोपविलेले आहे किंवा जिला त्या कामासाठी नेमलेले आहे अशी कोणतीही व्यक्ती, जेव्हा तिला तिची कर्तव्ये करण्याच्या पुष्ट्यर्थ असे करण्यास प्राधिकृत केले असेल त्याखेरीज, तिला ज्ञात असलेली कोणतीही माहिती किंवा तिचा कोणताही भाग, कोणताही गैरवाजवी फायदा किंवा गैर लाभ मिळविण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीकडे उघड करणार नाही किंवा उघड करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा अवगत करणार नाही.

प्राश्निकाची कर्तव्ये.

**६.** जिला कोणत्याही परीक्षेत प्राश्निक म्हणून नियुक्त केले असेल अशी कोणतीही व्यक्ती, या बाबतीत तिची नियुक्ती करणा-या स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाने तिला दिलेल्या लेखी सूचनांनुसार असेल त्याखेरीज, तिने काढलेली प्रश्नपत्रिका किंवा तिची प्रत, कोणत्याही व्यक्तीस पुरविणार नाही किंवा पुरविण्याची व्यवस्था करणार नाही अथवा अशा प्रश्नपत्रिकेचा मजकूर कळविणार नाही किंवा कोणत्याही रीतीने प्रसिद्ध करणार नाही.

इतर अपराध. **७.** जर, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या गटाने किंवा संस्थेने, कोणतेही अनुचित मार्ग अवलंबिले असतील किंवा कलमे ३,४,५ व कलम ६ खालील अपराध केला असेल तर, स्पर्धा परीक्षा प्राधिकरण किंवा सेवा पुरवठादार, अपराधाची माहिती तात्काळ संबंधित पोलीस प्राधिकरणास देईल आणि स्पर्धा परीक्षा प्राधिकरणास देखील कळवील :

परंतु, जर सेवा पुरवठादार, अनुचित मार्गांचा अवलंब करीत असेल व अपराध करीत असेल अथवा अपराध करणे सुकर करण्यात गुंतला असेल तर, स्पर्धा परीक्षा प्राधिकरण, त्याची माहिती संबंधित पोलीस प्राधिकरणास देईल.

परीक्षा केंद्राव्यतिरिक्त कोणत्याही जागांचा परीक्षेसाठी वापर न करणे. **८.** सेवा पुरवठादाराने किंवा संस्थेने किंवा सेवा पुरवठादाराशी सहयोगी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागेचा, स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाची लेखी मान्यता न घेता, स्पर्धा परीक्षा घेण्याच्या प्रयोजनासाठी पर्यायी जागा म्हणून वापर करणे हा, अपराध असेल :

परंतु, या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, जेव्हा कोणत्याही दैवी आपत्तीमुळे, स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाची पूर्व मान्यता न घेता, परीक्षा केंद्रात कोणताही बदल केला असेल तेव्हा, तो अपराध असणार नाही.

सेवा पुरवठादाराच्या व इतर व्यक्तींच्या बाबतीतील अपराध. **९.** (१) सेवा पुरवठादाराशी सहयोगी व्यक्तींसह कोणतीही व्यक्ती, जर वैयक्तिकरीत्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीशी किंवा व्यक्तींच्या गटाशी किंवा संस्थांशी संगनमत करून, स्पर्धा परीक्षा घेण्यामध्ये कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या गटाला किंवा संस्थेला कोणत्याही अनधिकृत रीतीने सहाय्य करीत असेल तर, तिने अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.

(२) सेवा पुरवठादार किंवा त्याच्याशी सहयोगी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, जर कोणत्याही अनुचित मार्गांची किंवा कोणताही अपराध केल्याची घटना संबंधित प्राधिकरणाला कळविण्यात कसूर केली असेल तर, तिने अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.

(३) जेव्हा सेवा पुरवठादाराने केलेला अपराध, प्रथमदर्शनी, अशा सेवा पुरवठादाराच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिका-याच्या संमतीने किंवा मूकसंमतीने करण्यात आला असल्याचे अन्वेषणामध्ये सिद्ध झाले असेल तेव्हा, अशी व्यक्तीदेखील त्यानुसार कारवाई केली जाण्यास पात्र असेल :

परंतु, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, जर कोणत्याही व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला होता आणि असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने यथोचित दक्षता घेतली होती असे सिद्ध केले असेल तर, ती या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षेस पात्र असणार नाही.

## प्रकरण चार

## अपराधांकरिता शिक्षा.

दखलपात्र अपराध. **१०.** या अधिनियमाखालील सर्व अपराध, दखलपात्र, अजामीनपात्र व आपापसांत न मिटवण्याजोगे असतील.

या अधिनियमाखालील अपराधासाठी शिक्षा. **११.** (१) या अधिनियमान्वये अनुचित मार्गांचा अवलंब करणा-या व अपराध करणा-या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा होईल आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र असतील. द्रव्यदंडाचे प्रदान करण्यात कसूर केल्यास, भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या तरतुदींनुसार कारावासाची अतिरिक्त शिक्षा लादण्यात येईल. २०२३ चा ४५.

(२) सेवा पुरवठादार एक कोटी रुपयांपर्यंत द्रव्यदंडाची शिक्षा लादण्यास देखील पात्र असेल आणि परीक्षेचा प्रमाणशीर खर्च, अशा पुरवठादाराकडून वसूल करण्यात येईल आणि त्यास, कोणतीही स्पर्धा परीक्षा घेण्याची कोणतीही जबाबदारी सोपविण्यापासून चार वर्षांच्या कालावधीकरिता रोधीत करण्यात येईल.

(३) जेव्हा या अधिनियमाखालील अपराधाचे अन्वेषण करताना, कोणत्याही सेवा पुरवठादार भागीदार संस्थेच्या संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या किंवा प्रभारी व्यक्तीच्या संमतीने किंवा संगनमताने अपराध करण्यात आला आहे असे सिद्ध झाले असेल तेव्हा, तो, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी दहा वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि एक कोटी रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल. द्रव्यदंडाचे प्रदान करण्यात कसूर केल्यास, भारतीय न्याय संहिता,२०२३ याच्या तरतुदींनुसार कारावासाची अतिरिक्त शिक्षा लादण्यात येईल. (२०२३ चा ४५.)

(४) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, जर अशा कोणत्याही व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला होता आणि असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याकरिता तिने यथोचित दक्षता घेतली होती असे सिद्ध केले असेल तर, ती व्यक्ती, या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षेस पात्र असणार नाही.

संघटित गुन्हे.

**१२.** (१) जर स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाशी किंवा सेवा पुरवठादाराशी किंवा इतर कोणत्याही संस्थेशी संबंधित असलेल्या व्यक्तींसह एखाद्या व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या गटाने, संघटित गुन्हा केला असेल तर, त्या व्यक्ती, पाच वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु जी दहा वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि एक कोटी रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल. द्रव्यदंडाचे प्रदान करण्यात कसूर केल्यास, भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या तरतुदींनुसार कारावासाची अतिरिक्त शिक्षा लादण्यात येईल. (२०२३ चा ४५.)

(२) जर एखादी संस्था किंवा सेवा पुरवठादार, संघटित गुन्हा करण्यात सहभागी असेल तर, तिची मालमत्ता, जप्त करण्यास व समपहरण करण्यास अधीन असेल आणि परीक्षेचा प्रमाणशीर खर्च देखील त्यामधून वसूल करण्यात येईल.

## प्रकरण पाच

## चौकशी व अन्वेषण.

अन्वेषण करण्याचे अधिकार प्रदान केलेले अधिकारी.

**१३.** (१) पोलीस उप अधीक्षकाच्या किंवा सहायक पोलीस आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाचे अन्वेषण करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, कोणत्याही राज्य अन्वेषण अभिकरणाकडे अन्वेषण सोपविण्याचा अधिकार असेल.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

**१४.** (१) राज्य शासनास, अनुसूचीमध्ये कोणतीही नोंद जादादाखल करून किंवा तिच्यात फेरबदल करून किंवा ती वगळून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि त्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी अनुसूचीमध्ये सुधारणा करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे.

**१५.** स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी हे, जेव्हा ते या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींच्या अनुसार, कार्य करीत असतील किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत असेल तेव्हा, भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येतील. २०२३ चा ४५.

कोणत्याही लोकसेवकाने सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

**१६.** कोणत्याही लोकसेवकाने, त्याची शासकीय कार्ये पार पाडताना किंवा त्याच्या अधिकाराचा वापर करताना, सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याच्या अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, त्याच्याविरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही :

परंतु, कोणत्याही स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाच्या सेवेतील लोकसेवक हे, अशा स्पर्धा परीक्षा प्राधिकरणाच्या सेवा नियमांच्या अटींनुसार प्रशासकीय कारवाईच्या अधीन असतील :

परंतु आणखी असे की, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध केल्याचे सिद्ध करण्यासाठी प्रथमदर्शनी प्रकरण अस्तित्वात असेल, तेव्हा, अशा लोकसेवकाविरुद्ध कार्यवाही करण्यास प्रतिबंध होणार नाही.

या अधिनियमाच्या तरतुदी इतर कायद्यांशिवाय असणे.

**१७.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात, असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांशिवाय असतील, आणि त्यांचे न्यूनीकरण करणा-या नसतीलः

परंतु, या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा अशा कोणत्याही कायद्याच्या आधारे, अंमलात असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये अंतर्भूत असलेली त्याच्याशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट असली तरी, अंमलात असतील.

नियम करण्याचा अधिकार.

**१८.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल, आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना, प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१९.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप, उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

## अनुसूची - एक

**[ कलम २ (ग), (घ) व कलम १४ पहा ]**

(क) (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने,

(२) अन्य कोणत्याही प्राधिकरणाने किंवा निवड समितीने किंवा सेवा पुरवठादाराने किंवा स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी शासनाने, वेळोवेळी, प्राधिकृत केलेल्या संस्थेने,

(३) शासनाच्या कोणत्याही विभागाने,

घेतलेली कोणतीही परीक्षा.

(ख) (१) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेली शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (टीएआयटी) आणि शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.